# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

# प्रेसनोट

**CB/65/2025**

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २०/११/२०२५ |
|---|---|

## ''अंमली पदार्थाचे रॅकेट उध्वस्त मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेने केली कारवाई ''

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करण्या-या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दिनांक १५/११/२५ रोजी मध्यवर्ती कक्ष गुन्हे शाखा नवी मुंबई नेमणुकीतील. पोलीस अंमलदार /ओंकार भालेराव यांना अंमली पदार्थ बाबत मिळालेल्या गोपनीय बातमीच्या अनुषंगाने वपोनि श्री.सुनिल शिंदे व पथकाने रोडपाली लिंक रोड डीडी धाब्याजवळ सेक्टर १६ कळंबोली नवी मुंबई या ठिकाणी गांजा विक्री करता आलेल्या चार इसमांना चार चाकी वाहनासह ताब्यात घेतले. त्यांच्याकडून एकूण ५ किलो ५०० ग्राम वजनाचा गांजा हा अमली पदार्थ हस्तगत केला. तसेच एक स्विफ्ट डिझायर आणि ०४ वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल असा एकूण (०९ लाख ९० हजार रुपये ) किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर कारवाई बाबत कळंबोली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं २५५/२०२५ एनडीपीस अॅक्ट २० (ब), ८ (क), अन्वये गुन्हा दाखल आहे. ०४ आरोपींना अटक केली असुन पुढील तपास कळंबोली पोलीस ठाणे तपास करीत आहे.

**सदरची उल्लेखनीय कामगिरी सपोआ गुन्हे शाखा श्री.अजयकुमार लांडगे यांचे मार्गशनाने मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनि सुनिल शिंदे, सपोनि/महेश जाधव, सपोउपनि/मंगेश वाट, पोलीस अंमलदार -नितीन जगताप, दिलीप ठाकुर, ओंकार भालेराव यांनी केली आहे.**

-----ooo-----